# पुणे महानगरपालिका

## विशेष मुलांची शाळेकरिता करार पद्धतीवरील शिक्षक भरती जाहिरात

## शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका

## कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ०५

- शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका संचलित विशेष मुलांची शाळा, मनपा शाळा क्र. १४ मुलांची, शिवाजीनगर, पुणे ५ या शाळेसाठी सन २०२३-२४ करिता तात्पुरत्या स्वरूपात केवळ सहा महिनेपेक्षा कमी कालावधीकरिता दरमहा एकवट मानधन रक्कम रुपये २००००/- (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) वर ''करार पद्धतीवरील विशेष शिक्षक'' या पदाकरिता निवड, प्रतीक्षा यादी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या प्राप्त गुणानुक्रमे नेमणूक करण्यात येणार आहे.

**शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता खालीलप्रमाणे निश्चित केली जाईल.**

| क्र. | पद | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|
| १ | करार पद्धतीवरील विशेष शिक्षक | माध्यमिक अथवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र धारक व बौद्धिक अक्षम प्रवर्गातील प्रशिक्षित पदविका, डी.एस.ई. (आय डी) व आर सी आय नोंदणी प्रमाणपत्र धारक. |

एकूण पदे - २

| अजा | अज | विजा अ | भजब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |

- उमेदवारांनी जाहिरात प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून ५ दिवसांपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत ''विशेष मुलांची शाळा, मनपा शाळा क्र १४ मुलांची, कॉंग्रेस भवनमागे, शिवाजीनगर, पुणे ५'' येथे समक्ष हस्त पोहोच सादर करावेत. पोस्टाने / टपालाने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज सादर करतेवेळी उमेदवारांनी त्यांची मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत घेऊन यावीत.
- सविस्तर माहिती, अर्जाचा नमुना व जाहिरात https://www.pmc.gov.in/en/recruitments या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी वरील संकेतस्थळाचे अवलोकन करावे.
- उमेदवारांनी भारतीय पुनर्वसन परिषद (आर सी आय) नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण जोडणे आवश्यक आहे. नूतनीकरण प्रमाणपत्र नसल्यास अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. : १/५७४ दि. २८/०७/२०२३